

Rayat Shikshan Sanstha's

Balwant College, Vita

# News Paper Clippings

# 2019-2020

## Rayat Shikshan Sanstha’s
## Balwant College Vita
## News Papers Clippings 2019-2020

### Tarun Bharat 03-01-2020



तरुण भारत

सांगली

www.tarunbharat.com

शुक्रवार दि. ३ जानेवारी २०२०

₹ ६.००

बेळगाव • गोवा •

शुक्रवार, ३ जानेवारी २०२०

# ‘डॉ. विक्रम साराभाई भारतीय अवकाश संशोधन केंद्राचे जनक’

प्रतिनिधी
विटा

डॉ. विक्रम साराभाई यांनी अहमदाबाद येथे भारतातील पहिली अंतराळ संशोधन प्रयोगशाळा उभी केली. म्हणूनच ते भारतीय अवकाश संशोधन केंद्राचे जनक आहेत, असे प्रतिपादन अतिग्रे येथील संजय घोडावत विद्यापीठाचे डॉ. डी. पी. नाडे यांनी केले.

येथील बळवंत महाविद्यालयात भौतिकशास्त्र विभागाच्यावतीने ‘भारतीय अंतराळ कार्यक्रम आणि विक्रम साराभाई’ या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी डॉ. डी. पी. नाडे बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे होते.

डॉ. डी. पी. नाडे म्हणाले, अतिशय कठीण परिस्थितीत डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम आणि डॉ. सतीश धवन यांना सोबत घेऊन डॉ. विक्रम साराभाई यांनी अहमदाबाद येथे भारतातील पहिली अंतराळ संशोधन प्रयोगशाळा उभी केली. म्हणून त्यांना भारतीय अंतराळ केंद्राचे जनक मानले जाते. डॉ. विक्रम साराभाई पासून डॉ. के. सीवन पर्यंतच्या इस्त्रोच्या सर्व प्रमुखांनी अत्यंत परिश्रम घेऊन इस्त्रो या अवकाश संस्थेला जगात चौथ्या स्थानापर्यंत पोहचवले. अवकाश संशोधनामुळे देशाची सर्वांगीण प्रगती होवू शकते. त्यासाठी बीएस्सी भौतिकशास्त्र आणि गणिताच्या विद्यार्थ्यांनी या शाखेकडे आकर्षित व्हावे, असे आवाहन डॉ. नाडे यांनी केले.

**डॉ. डी. पी. नाडे यांचे प्रतिपादनः बळवंतमध्ये व्याख्यान उत्साहत**

प्रास्ताविक विभाग प्रमुख डॉ. सी. आर. बोबडे यांनी केले तर प्रा. प्रियांका शिंदे यांनी आभार मानले. यावेळी प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.

ग्रंथपाल
बळवंत कॉलेज, विटा

# Tarun Bharat Date 05-01-2020


तरुण भारत

सांगली

शताब्दी वर्ष १००

१९१९ - २०१९

www.tarunbharat.com

✦ पाने १२+८ ✦ ₹ ६.००

रविवार दि. ५ जानेवारी २०२०

बेळगाव •


## बळवंत विद्यालयात उद्या अविष्कार संशोधन महोत्सव

प्रतिनिधी
विटा

येथील बळवंत महाविद्यालयात सोमवार ६ जानेवारी रोजी सांगली जिल्हास्तरीय अविष्कार संशोधन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. महोत्सवाचे उद्घाटन डॉ. सी. टी. कारंडे यांच्याहस्ते करण्यात येणार आहे, अशी माहिती प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे यांनी दिली.

प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे उपस्थित राहणार आहेत, तर अध्यक्षस्थानी रामानंदनगर, बुर्ली येथील कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. डी. कदम असणार आहेत.




तरुण भारत

अर्थसंगत

सोमवार दि. ६ जानेवारी २०२०

अर्थव्यवस्थेचा विस्तारण्या स्तर पायाभूत सुविधांवर भर

- अर्थमंत्र्यांच्या १०२ लाख कोटींच्या पायाभूत सुविधा कोणत्या ?

एकाच कटाक्षात, सारा 'अर्थ' लक्षात !



LIBRARIAN
Balwant College
VITA.

# Janpravas Date-11-01-2020

दैनिक www.janpravas.in | janpravaslive.tv बातम्यांचा राजा

जनप्रवास सांगली

पो.र.नं.SGL/25/2019-21 RNI NO. MAHMAR/2003/11365 शनिवार, दि.११ जानेवारी २०२० वर्ष-१५ अंक-३३ पाने-१० मूल्य ५ रु..

● मुंबई ● पुणे ● कोल्हापूर ● सातारा

BALWANT COLLEGE LIBRARY VITA

## विद्यार्थ्यांच्या संशोधन वृत्तीस चालना देण्याची गरज : प्राचार्य डॉ. सी. टी. कारंडे



विटा : येथील बळवंत कॉलेजमध्ये अविष्कार संशोधन महोत्सवाच्या उदयाटनप्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ. सी. टी. कारंडे.

**विटा ● प्रतिनिधी**

मानवी जीवनातील संशोधन ही एक महत्त्वाची गोष्ट आहे. मानवी जीवन सुखी करणे तसेच संशोधन हा समाजाभिमुख असणे ही संशोधनाची प्रमुख उद्दिष्टे आहेत. विद्यार्थ्यांच्या संशोधन वृत्तीस चालना देण्यासाठी विद्यापीठाने अविष्कार ही संकल्पना मांडली आहेत. त्या संकल्पनेच्या मांध्यमातून आधिकाधिक संशोधक विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पना मांडाव्यात, असे प्रतिपादन मिरज महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी. टी. कारंडे यांनी केले.

येथील बळवंत कॉलेजमध्ये बळवंत कॉलेज आणि शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या सांगली जिल्हास्तरीय अविष्कार संशोधन महोत्सवाच्या उद्‌घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे होते.

प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे यांनी संशोधन महोत्सवामध्ये सहभागी संशोधक विद्यार्थ्यांचे स्वागत केले. विविध क्षेत्रामध्ये संशोधन करून विद्यार्थ्यांनी अधिकाधिक पेटंट आपल्या नावावर करून घ्यावेत, असे आवाहन केले.

या संशोधन महोत्सवास सांगली जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातील जवळपास १७० संशोधक स्पर्धकांनी सहभाग नोंदविला. कला, भाषा, मानवविद्या, वाणिज्य, विज्ञान, अभियांत्रिकी, औषधनिर्माण अशा विविध विभागामध्ये या स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धांचे परीक्षण करण्यासाठी सांगली, सातारा, कोल्हापूर येथील तज्ञ परीक्षक उपस्थित होते.

सांगली जिल्हास्तरीय आविष्कार संशोधन महोत्सव स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे : मानव विद्याशाखा, भाषा, कला विभाग : प्रथम क्रमांक - अनिरुद्ध बापूसो चौगुले (कन्या महाविद्यालय, मिरज), व्दितीय क्रमांक - अश्विनी मारुती सुर्यवंशी (के.बी.पी. इस्लामपूर), तृतीय क्रमांक - सचिन हरिदास जाधव (बळवंत कॉलेज, विटा), वाणिज्य, व्यवस्थापन आणि कायदे विभाग : प्रथम क्रमांक - मोनाली प्रकाश भोसले (आर.आय.टी.कॉलेज, इस्लामपूर), व्दितीय क्रमांक - कल्याणी रविंद्र देवकर (डी.ए.बी.एन.कॉलेज, चिखली), तृतीय क्रमांक - श्रीलक्ष्मी श्रीकुमार मुंडणचेरी (न्यु लॉ कॉलेज, सांगली), विज्ञान विभाग : प्रथम क्रमांक - सिद्धार्थ महेश साखरे (आदर्श कॉलेज, विटा), व्दितीय क्रमांक - अभिषेक माधव यादव (आप्पासाहेब बिरनाळे कॉलेज, सांगली), तृतीय क्रमांक - सत्यम प्रकाश तिरमारे (ए.एस.सी.कॉलेज, रामानंदनगर), कृषी आणि पशुधन विभाग : प्रथम क्रमांक- पूजा प्रकाश माळी (के.एन.पी.कॉलेज, वाळवा), व्दितीय क्रमांक - पूनम पुंडलिक बुरबुसे (बळवंत कॉलेज, विटा), तृतीय क्रमांक - कल्याणी निवास जाधव (आदर्श कॉलेज ऑफ फार्मसी, विटा), अभियांत्रिकी व तंत्रज्ञान विभाग : प्रथम क्रमांक - अक्षता रामचंद्र दळवी (ए.सी.एस.कॉलेज, पलूस), व्दितीय क्रमांक - संदिप बी. रुपनवा (आर.आय.टी. कॉलेज, इस्लामपूर), तृतीय क्रमांक - सागर शामराव कदम (ए.एस.सी.कॉलेज, रामानंदनगर), वैद्यकशास्त्र आणि औषधनिर्माण विभाग : प्रथम क्रमांक - तेजस्विनी हेमंत कांबळे (एम.बी.एस.के.कन्या महाविद्यालय, कडेगाव), व्दितीय क्रमांक - माधुरी उत्तम चव्हाण (बळवंत कॉलेज, विटा), तृतीय क्रमांक - स्वप्नील विनोद काशिद (आप्पासाहेब बिरनाळे कॉलेज, सांगली).

या महोत्सवाच्या समारोप समारंभप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय रामानंदनगर बुर्लीचे प्राचार्य डॉ. एल. डी. कदम उपस्थित होते.

स्वागत व प्रास्ताविक अविष्कार महोत्सवाचे समन्वयक डॉ. ए. बी. तपासे यांनी केले. यावेळी शिवाजी विद्यापीठच्या अविष्कार संशोधन विभागाचे समन्वयक डॉ. एस. बी. महाडीक, डॉ. के. व्ही. मारुळकर, डॉ. पी. के. पवार, विज्ञान विभागाच्या उपप्राचार्य डॉ. यु. एच. शहा, कला विभागाचे उपप्राचार्य डॉ. डी. एम. सनदी, प्रा. डॉ. एस. व्ही. पाटील, प्रा. आर. जे. पाटील, प्रा. जी. बी. पवार, प्रा. डॉ. ए. एस. सरतापे यांच्यासह सर्व विद्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. शहनाज सय्यद व प्रा. संध्या पोतदार यांनी केले. आभार डॉ. पी. एस. साळुंखे यांनी मानले.

LIBRARIAN
Balwant College
VITA.

**Tarun Bharat Date 13-01-2020**

१९९९ - २०१९
www.tarunbharat.com
✦ पाने १२+४+४ ✦ ₹ ६.०० सोमवार दि. १३ जानेवारी २०२० बेळगाव • गोवा • मुंबई •
तरुण भारत

# बळवंत महाविद्यालयात अविष्कार संशोधन महोत्सव

प्रतिनिधी
विटा

येथील बळवंत महाविद्यालय येथे सांगली जिल्हास्तरीय अविष्कार संशोधन महोत्सव स्पर्धा उत्साहात पार पडल्या. महोत्सवाचे उद्घाटन मिरज महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी. टी. कारंडे यांच्याहस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी डॉ. प्राचार्य चंद्रकांत खिलारे होते.

या स्पर्धेत मानव विद्याशाखा, भाषा, कला विभागात मिरज महाविद्यालयाचा अनिरुद्धा बापुसो चौगुले याने प्रथम, इस्लामपूर येथील केबीपी महाविद्यालयाची अश्विनी मारूती सुर्यवंशी हिने द्वितीय, तर बळवंत महाविद्यालयाचा सचिन हरिदास जाधव याने तृतीय क्रमांक पटकावला. वाणिज्य, व्यवस्थापन आणि कायदे विभागात इस्लामपूर येथील आरआयटी महाविद्यालयाची मोनाली प्रकाश भोसले हिने प्रथम, चिखली येथील डीएबीएन महाविद्यालयाची कल्याणी रविंद्र देवकर हिने द्वितीय, तर सांगली येथील न्यू लॉ कॉलेजची श्रीलक्ष्मी श्रीकुमार मुंडणचेरी हिने तृतीय क्रमांक पटकावला.

विज्ञान विभागात विट्याच्या आदर्श महाविद्यालयाचा सिद्धार्थ महेश साखरे याने प्रथम, सांगली येथील आप्पासाहेब बिरनाळे कॉलेजचा अभिषेक माधव यादव याने द्वितीय, तर रामानंदनगर येथील सत्यम प्रकाश तिरमाने याने तृतीय क्रमांक पटकावला. कृषी आणि पशुधन विभागात वाळवा येथील केएनपी महाविद्यालयाची पुजा प्रकाश माळी हिने प्रथम, विट्याच्या बळवंत महाविद्यालयाची पुनम कुंडलिक बुरबुसे हिने द्वितीय, तर आदर्श कॉलेज ऑफ फार्मसीची कल्याणी निवास जाधव हिने तृतीयं क्रमांक पटकावला.

अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान विभागात पलूस येथील एसीएस कॉलेजची अक्षता रामचंद्र दळवी हिने प्रथम, इस्लामपूर येथील आरआयटी कॉलेजचा संदीप बी. रूपनवा याने द्वितीय, तर रामानंदनगर येथील एएससी कॉलेजचा सागर शामराव कदम याने तृतीय क्रमांक पटकावला. वैद्यकशास्त्र आणि औषध निर्माण विभागात कडेगाव येथील एमबीएसके कन्या महाविद्यालयाची तेजस्विनी हेमंत कांबळे हिने प्रथम, बळवंत महाविद्यालयाची माधुरी उत्तम चव्हाण हिने द्वितीय, तर सांगली येथील आप्पासाहेब बिरनाळे महाविद्यालयाचा स्वप्नील विनोद काशिद याने तृतीय क्रमांक पटकावला.

## ...ा पाटील वक्तृत्त्व स्पर्धेचे आयोजन

LIBRARIAN
Balwant College,
VITA.

**Pudhari Date 13-01-2020**

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com
दि: १२।१।२०२०.

# व्यावसायिक शिक्षण कॉलेजपासूनच द्या : चव्हाण

**कुपवाड : वार्ताहर**

वाणिज्य शाखेच्या विद्यार्थी, विद्यार्थीनीना व्यावसायिक शिक्षणाचे धडे कॉलेजपासूनच देणे आवश्यक आहेत, असे प्रतिपादन समृद्धी ग्रुप ऑफ इंडस्ट्रीजचे उपाध्यक्ष अमितकुमार चव्हाण यांनी केले.

विटा येथील बळवंत कॉलेजच्या विद्यार्थी, विद्यार्थीनीसाठी उद्योजक विकास व मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या वेळी ते बोलत होते. यावेळी कॉलेजचे प्राचार्य डॉ. खिलारे उपस्थित होते.

बी.कॉम प्रथम वर्ष ते एम कॉम द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

ते पुढे म्हणाले, आधुनिक वाणिज्य अभ्यासक्रम शिकवताना बी. कॉम प्रथम वर्षापासून विद्यार्थ्यांना फॅक्टरी व्हिजिट, मार्केट व्हिजिट, तसेच वेगवेगळ्या विभागातील प्रोजेक्ट करण्यासाठी प्रेरित केल्यास ते चांगले उद्योजक निश्चित घडतील.

वाणिज्य शाखेच्या प्रमुख डॉ. श्रेया पाटील यांनी या कार्यशाळेचे आयोजन केले होते.

LIBRARIAN
Balwant College
VITA.

**Pudhari Date-30-01-2020**

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक

# पुढारी

स्थापना १९३९

www.pudhari.com

सांगली गुरुवार । ३० जानेवारी २०२० । वर्ष ८२ । मुंबई, पुणे, औरंगाबाद, कोल्हापूर, सांगली, सातारा, ठाणे, रायगड, सिंधुदुर्ग, र

# यत संस्थेच्या तीन महाविद्यालयांना क्लस्टर विद्यापीठाची परवानगी

## शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रात पहिलेच क्लस्टर विद्यापीठ तयार होणार

हापूर : सचिन टिपकुर्ले

चार महाविद्यालये एकत्र आता क्लस्टर विद्यापीठ करू शकतात. महाराष्ट्रात नध्ये क्लस्टर विद्यापीठ झाले आहे. शिवाजी पीठ कार्यक्षेत्रातील सातारा त रयत शिक्षण संस्थेच्या महाविद्यालयांना क्लस्टर पीठ तयार करण्यास केंद्र ाची परवानगी मिळाली आहे. जी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील टर विद्यापीठ तयार करण्याची ता मिळणारी ही पहिलीच द्यालये असून आगामी णक वर्षात ती सुरू होण्याची शक्यता आहे.

पारंपरिक विद्यापीठांशी राज्यातील अनेक महाविद्यालये संलग्नित आहेत. या महाविद्यालयांना विद्यापीठ ठरवेल तो अभ्यासक्रम, परीक्षा पद्धती, विद्यापीठ प्रशासनाचे आदेश पाळणे बंधनकारक आहे. यातून नव्याने उभारलेल्या शिक्षण संस्थांशी गुणवत्तेच्या आधारे स्पर्धा करतानाही म हाविद्यालये मागे पडत होती. स्वतंत्रपणे निर्णय घेण्याचे कोणतेही अधिकारी या महाविद्यालयांना नाहीत, पण नव्याने अभिमत विद्यापीठांची संकल्पना पुढे आली.यातूनच केंद्र सरकारच्या विद्यापीठ अनुदान आयोगाने राष्ट्रीय उच्चतर राष्ट्रीय शिक्षा अभियान(रुसा) अंतर्गतदेशातील महाविद्यालयांना क्लस्टर विद्यापीठ सुरु करण्याला मान्यता देण्यास सुरवात केली. यापूर्वी मुंबईतील चार सीडनॅम, एल्फीस्टन कॉलेज, इन्स्टीट्युट ऑफ सायन्स यांनी क्लस्टर विद्यापीठात मध्ये सहभागी झाले आहेत.

### येत्या शैक्षणिक वर्षात सुरू होणार : कराळे

याबाबत रयत शिक्षण संस्थेचे सचिव बी.के. कराळे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी या तीन महाविद्यालयांना क्लस्टर विद्यापीठ करण्याची परवानगी केंद्र सरकारने दिली आहे. राज्य शासनाची परवानगी अद्याप मिळालेली नाही. ही परवानगी मिळाल्यानंतर येत्या शैक्षणिक वर्षात हे विद्यापीठ सुरु होण्याची शक्यता आहे.

आता नव्याने शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील रयत संस्थेची तीन महाविद्यालय या क्लस्टर विद्यापीठ योजनेत सहभागी होत आहेत. यामध्ये डी.जी. कॉलेज सातारा, छत्रपती शिवाजी कॉलेज ऑफ आर्टस कराड, वाय.सी कॉलेज ऑफ सायन्स या महाविद्यालयांचा समावेश आहे. ही महाविद्यालये यापूर्वीच स्वायत्त झाली आहेत. लवकरच पश्चिम महाराष्ट्रातील पहिले क्लस्टर विद्यापीठ सातारा येथे उभारणार आहे. क्लस्टर विद्यापीठ उभारल्यास त्यांचा स्वतंत्र कुलगुरु, स्वतंत्र अभ्यासक्रम, परीक्षा पध्दती, मॅनेजमेंट कौन्सिल, ॲकॅडमी कौन्सिल व स्वतंत्र निधी असणार आहे. ज्या महाविद्यालयांना सलग तीन वेळा ए मानांकन मिळाले आहे. त्यांना या योजनेत सहभागी होता येणार आहे.त्यामुळे पारंपारिक विद्यापीठांशी संलग्नित महाविद्यालयांची संख्या कमी होणार आहे.

**Janpravas Date-06-02-2020**

दैनिक
बातम्यांचा राजा
जनप्रवास
Website : janpravas.in
सांगली- कोल्हापूर ■ पान ३
■ गुरुवार, दि. ६ फेब्रुवारी २०२०

# विट्यातील 'बळवंत'मध्ये ग्रंथालय विभागातर्फे १० रोजी राज्यस्तरीय कार्यशाळा

विटा ● प्रतिनिधी

बळवंत कॉलेजमध्ये दि. १० फेब्रुवारी २०२० रोजी ग्रंथालय विभागाच्या वतीने वाङमयचौर्य आणि प्रकाशन हक्क या विषयावर एकदिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन केले आहे, अशी माहिती प्राचार्य डॉ. सी. जे. खिलारे यांनी दिली.

यु.जी.सी, विद्यापीठाच्या तसेच नॅकच्या ध्येयधोरणानुसार प्रत्येक महाविद्यालयांनी आपला संशोधनाकडे असणारा कल वाढवावा तसेच गुणवत्ता सुधारणेसाठी महाविद्यालयातील संशोधनाचे काम करणारे विद्यार्थी, प्राध्यापक यांना संशोधनाची उत्तम प्रकारे माहिती मिळावी व महाविद्यालयातील संशोधन व गुणवत्ता वाढीस वाव मिळावा या दृष्टीने ही कार्यशाळा उपयुक्त ठरणार आहे. या कार्यशाळेमध्ये शिवाजी कॉलेज साताराचे ग्रंथपाल प्रा. एस. टी. लोखंडे, शाहू कॉलेज कोल्हापूरचे ग्रंथपाल प्रा. बी. डी. ढाकणे, कला आणि वाणिज्य महाविद्यालय माढाचे ग्रंथपाल प्रा. वाय. आर. चव्हाण या तज्ज्ञ मार्गदर्शकांचे मार्गदर्शन लाभणार आहे. या कार्यशाळेमध्ये अधिकाधिक संशोधक विद्यार्थी, प्राध्यापक यांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी. जे. खिलारे यांनी केले आहे.

LIBRARIAN
Balwant College
VITA.

**Tarun Bharat Date 07-02-2020**


# तरुण भारत

सांगली

www.tarunbharat.com

शुक्रवार दि. ७ फेब्रुवारी २०२०

बेळगाव • गोवा


## 'बळवंत'मध्ये 'वाङ्मयचौर्य, प्रकाशन हक्क'वर कार्यशाळा

प्रतिनिधी
विटा

येथील बळवंत महाविद्यालयात सोमवार १० फेब्रुवारी रोजी 'वाङमयचौर्य आणि प्रकाशन हक्क' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.



ग्रंथालय विभागाच्यावतीने कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे यांनी दिली.

याबाबत प्राचार्य डॉ. खिलारे यांनी सांगितले, महाविद्यालयात ग्रंथालय विभागाच्यावतीने सोमवार १० फेब्रुवारी रोजी 'वाङमयचौर्य आणि प्रकाशन हक्क' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यशाळेत ग्रंथपाल प्रा. एस. टी. लोखंडे, कोल्हापूर येथील शाहू कॉलेजचे ग्रंथपाल प्रा. बी. डी. ढाकणे, माढा येथील कला आणि वाणिज्य महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. वाय. आर. चव्हाण मार्गदर्शन करणार आहेत.

युजीसी, विद्यापीठाच्या तसेच नॅकच्या ध्येयधोरणानुसार प्रत्येक महाविद्यालयांनी संशोधनाकडे असणारा कल वाढवावा, गुणवत्ता सुधारण्यासाठी संशोधनाचे काम करणारे विद्यार्थी, प्राध्यापक यांना संशोधनाची माहिती मिळावी आणि संशोधन आणि गुणवत्ता वाढीस वाव मिळावा, यासाठी कार्यशाळा उपयुक्त ठरणार आहे. कार्यशाळेचा लाभ घेण्याचे आवाहन डॉ. खिलारे यांनी केले आहे.


LIBRARIAN
Balwant College
VITA.

**Janpravas Date-19-02-2020**

दैनिक बातम्यांचा राजा
जनप्रवास
Website : janpravas.in  सांगली- कोल्हापूर  पान ३  बुधवार, दि. १९ फेब्रुवारी २०२०

# बळवंत कॉलेजमध्ये ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागाच्यावतीने कार्यशाळा संपन्न

**विटा ● प्रतिनिधी**

बळवंत कॉलेज येथे ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागाच्या वतीने वाङ्मयचौर्य आणि प्रकाशन हक्क या विषयावर एकदिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळा मोठ्या उत्साहात संपन्न झाली. यु.जी.सी. नॅक तसेच विद्यापीठाच्या ध्येयधोरणानुसार प्रत्येक महाविद्यालयांनी आपला संशोधनाकडे असणारा कल वाढवावा तसेच गुणवत्ता सुधारण्यासाठी महाविद्यालयातील संशोधनाचे काम करणारे विद्यार्थी, प्राध्यापक यांना संशोधनाची उत्तम प्रकारे माहिती मिळावी यादृष्टीने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेमध्ये प्रा. एस. टी. लोखंडे (ग्रंथपाल,शिवाजी कॉलेज,सातारा), प्रा. बी. डी. ढाकणे (ग्रंथपाल, शाहू कॉलेज, कोल्हापूर), प्रा. वाय. आर. चव्हाण (ग्रंथपाल, कला आणि वाणिज्य महाविद्यालय, माढा) या तज्ज्ञ मार्गदर्शकांचे मार्गदर्शन लाभले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी. जे. खिलारे होते.

प्रास्ताविक ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागप्रमुख प्रा. जे. ए. पाटील यांनी केले. कार्यशाळेचे उदघाटन प्रा. एस. टी. लोखंडे यांच्या हस्ते झाले. ही कार्यशाळा तीन सत्रामध्ये संपन्न झाली.

पहिल्या सत्रामध्ये प्रा. एस. टी. लोखंडे यांनी संदर्भग्रंथसूची तयार करण्याच्या आधुनिक पध्दती याविषयावर मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रामध्ये प्रा. वाय. आर. चव्हाण यांनी वाङ्मयचौर्य शोध प्रक्रियांचा परिचय तसेच प्रकाशन हक्क या विषयावर तर तिसऱ्या सत्रामध्ये प्रा. बी. डी. ढाकणे यांनी इंटरनेटवरील माहिती मिळविण्यासाठी वापरली जाणारी प्रक्रिया याविषयावर सखोल मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. सी. जे. खिलारे यांनी संशोधन प्रक्रियेसंबंधी सखोल मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. यू. एच. शहा, डॉ. पी. एस. साळुंखे, डॉ. ए. जे. बरकडे, डॉ. सी. आर. बोबडे, डॉ. एस. व्ही. पाटील, डॉ. ए. एस. सरतापे, डॉ. के. बी. माने, प्रा. जे. ए. मुलाणी यांच्यासह विविध महाविद्यालयातील ग्रंथपाल, प्राध्यापक तसेच संशोधक विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. एस. एम. सय्यद यांनी केले. आभार प्रा. एस. एस. चिले यांनी मानले.

LIBRARIAN
Balwant College
VITA.

बळवंत कॉलेज
ग्रंथपाल विभाग

**Janpravas Date-19-02-2020**


दैनिक

www.janpravas.in | janpravaslive.tv

बातम्यांचा राजा

# जनप्रवास

पो.र.नं.SGL/25/2019-21 RNI NO. MAHMAR/2003/11365 बुधवार, दि.१९ फेब्रुवारी २०२० वर्ष-१५ अंक-७१ पाने-१० मूल्य ५..

सांगली

मुंबई ● पुणे ● कोल्हापूर ● सातारा


## बळवंतच्या विद्यार्थ्यांचे राष्ट्रीय स्तरावरील युवा महोत्सवात यश

विटा ● प्रतिनिधी

असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज द्वारा घेतल्या जाणाऱ्या राष्ट्रीय स्तरावरील युवा महोत्सवामध्ये शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरच्या संघाने महाराष्ट्रात प्रथम व अखिल भारतीय स्तरावर पाचवा क्रमांक प्राप्त करत उत्तुंग यश संपादन केले.

नोयडा नवी दिल्ली येथे संपन्न झालेल्या या महोत्सवामध्ये शिवाजी विद्यापीठाच्या वाद्यवृंद व शिवरथ यामध्ये बळवंत महाविद्यालयाचे समर्थ जावीर व, राजू घोलप या दोन विद्यार्थ्यांचा समावेश आहे.



राष्ट्रीय स्तरावरील युवा महोत्सवामध्ये यश मिळविणारे बळवंत महाविद्यालयाचे विद्यार्थी समर्थ जावीर व राजू घोलप.

शिवाजी विद्यापीठाच्या संघात निवड झालेल्या या दोन विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांचा नेत्रदिपक अविष्कार करत गडचिरोली येथे झालेल्या इंद्रधनुष, गुजरात येथे झालेल्या पश्चिम भारतीय युवा महोत्सव तसेच नोयडा नवी दिल्ली येथील राष्ट्रीय करंडकावर डफडे व ढोलकी या लोकवाद्यावर हुकूमत गाजवत आपले नाव कोरले.

या विद्यार्थ्यांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी. जे. खिलारे, महाविद्यालयाच्या युवा महोत्सव समितीचे प्रमुख डॉ.दादासाहेब सनदी, मार्गदर्शक प्रा.के. बी. माने व प्रा. एस. व्ही. खोत यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या या उत्तुंग यशाबद्दल या विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाचे प्राचार्य महाविद्यालयाच्या युवा महोत्सव समितीचे सदस्य, सर्व प्राध्यापक वृंद व विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले.


LIBRARIAN
Balwant College
VITA.

बळवंत कॉलेज
ग्रंथपाल विभाग
विटा, जि. सांगली

# Tarun Bharat Date-19-02-2020

तरुण भारत
सांगली
www.tarunbharat.com
१२+४+१६ ✦ ₹ ६.००
बुधवार दि. १९ फेब्रुवारी २०२०
बेळगाव • गोवा • मुंबई •

## ‘बळवंत’मध्ये ‘बिल्डींग द ब्रिज’वर कार्यशाळा उत्साहात

प्रतिनिधी
विटा

येथील बळवंत महाविद्यालय येथे इंग्रजी विभाग आणि रयत शिक्षण संस्थेच्या दक्षिण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने, ‘बिल्डींग द ब्रिज’ या विषयावरील कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. प्राथमिक आणि माध्यमिक विद्यालयात इंग्रजी विषयाचे अध्यापन करणाऱ्या शिक्षकांसाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.



विटा : कार्यशाळेत मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे यावेळी प्रा. एस. एस. बागवडे, डॉ. पी. ए. पाटील, डॉ. डी. एम. सनदी आदी.

येथील बळवंत महाविद्यालय येथे प्राथमिक आणि माध्यमिक विद्यालयात इंग्रजी विषयाचे अध्यापन करणाऱ्या शिक्षकांसाठी ‘बिल्डींग द ब्रिज’ या विषयावरील कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. उद्घाटक म्हणून सातारा रयत शिक्षण संस्थेच्या दक्षिण विभागाचे इन्स्पेक्टर के. बी. मालुसरे, बीजभाषक म्हणून मिरज येथील डॉ. पी. ए. पाटील उपस्थित होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे होते.

इंग्रजी विषयाचे अध्यायन आणि अध्यापक दर्जात्मक व्हावे, विद्यार्थ्यांच्या मनात असणारी इंग्रजी विषयाची भीती दूर व्हावी याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. डॉ. पी. ए. पाटील यांनी इंग्रजी विषयाचे अध्ययन, अध्यापंन करताना लक्षात घ्यायच्या घटकांविषयी मार्गदर्शन केले.

कार्यशाळेत प्रा. व्ही. एम. गायकवाड यांनी ‘वर्ल्डस् ऑफ द वर्डस्’, इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. डी. एम. सनदी यांनी ‘सबस्टनस् ॲण्ड दि अकट’ या विषयावर तर प्रा. संध्या पोतदार यांनी ‘गुड गुड’ या विषयावर प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. यावेळी प्रा. ए. टी. ख. प्रा. जहांगीर मुलाणी, प्रा. भाग्यश्री दीक्षित, प्रा. संतोष दाढेल यांच्यासह प्राथमिक, माध्यमिक विद्यालयातील शिक्षक उपस्थित होते.

LIBRARIAN
Balwant College
VITA.

**Janpravas Date-19-02-2020**


दैनिक
बातम्यांचा राजा
# जनप्रवास
Website : janpravas.in
सांगली ■ लास्ट पेज
बुधवार, दि. १९ फेब्रुवारी २०२०


# बळवंतमध्ये 'बिल्डींग द ब्रिज' विषयावरील कार्यशाळा संपन्न

**विटा ● प्रतिनिधी**

बळवंत कॉलेज येथे इंग्रजी विभाग आणि रयत शिक्षण संस्था दक्षिण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात इंग्रजी विषयाचे अध्यापन करणाऱ्या शिक्षकांसाठी आयोजित केलेली बिल्डींग द ब्रिज या विषयावरील कार्यशाळा उत्साहात संपन्न झाली.

या कार्यशाळेसाठी उद्घाटक म्हणून रयत शिक्षण संस्थेचे दक्षिण विभाग इन्स्पेक्टर के. बी. मालुसरे, बीजभाषक म्हणून मिरज महाविद्यालय येथील डॉ. पी. ए. पाटील उपस्थित होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सी. जे. खिलारे होते.

इंग्रजी विषयाचे अध्ययन व अध्यापन दर्जात्मक व्हावे, विद्यार्थ्यांच्या मनामध्ये असणारी इंग्रजी विषयाची भीती दूर व्हावी तसेच इंग्रजी विषयाचे हसत-खेळत अध्यापन कसे करावे याविषयी या कार्यशाळेमध्ये मार्गदर्शन करण्यात आले.

बीजभाषक डॉ. पी. ए. पाटील यांनी एकूणच भारतीय शिक्षण व्यवस्थेचा आढावा घेत इंग्रजी भाषेचे अध्ययन व अध्यापन करताना लक्षात घ्यावयाच्या घटकांविषयी सखोल मार्गदर्शन केले. अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. सी. जे. खिलारे यांनी मानवी जीवनातील भाषेचे महत्त्व विषद केले.



विटा : येथील बळवंत महाविद्यालयात आयोजित बिल्डींग द ब्रिज या विषयावरील कार्यशाळेत मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. सी. जे. खिलारे.

या कार्यशाळेमध्ये वर्ल्डस ऑफ दि वर्डस या विषयावर प्रा. व्ही. एम. गायकवाड यांनी, इंग्रजी विभागप्रमुख डॉ. डी. एम. सनदी यांनी दि सबस्टन्स एंड दि अॅक्ट याविषयावर तर प्रा.संध्या पोतदार यांनी साऊंड गुड या विषयावर प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले.

यावेळी प्रा. ए. टी. खाडे, प्रा. जहांगीर मुलाणी, प्रा.भाग्यश्री दीक्षित, प्रा.संतोष दाढेल यांच्यासह परिसरातील प्राथमिक व माध्यमिक विद्यालयातील शिक्षक उपस्थित होते. आभार प्रा.सुनील बागवडे यांनी मानले.


LIBRARIAN
Balwant College
VITA.

**Tarun Bharat Date- 20-02-2020**


# तरुण भारत

सांगली

www.tarunbharat.com


₹ ६.०० गुरुवार दि. २० फेब्रुवारी २०२० बेळगाव • गोवा •


## बळवंत महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे यश

प्रतिनिधी
विटा

राष्ट्रीय स्तरावरील युवा महोत्सवांत शिवाजी विद्यापीठच्या संघाने महाराष्ट्रात प्रथम तर अखिल भारतीय स्तरावर पाचवा क्रमांक पटकावला. विद्यापीठाच्या संघात येथील बळवंत महाविद्यालयाचे विद्यार्थी समर्थ जावीर आणि राजू घोलप यांचा समावेश होता. त्यांच्या यशाचे परिसरातून कौतुक होत आहे.

असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज यांच्यावतीने राष्ट्रीय स्तरावर युवा महोत्सव घेण्यात येतो. या महोत्सवात कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठाच्या संघाने महाराष्ट्रात प्रथम तर अखिल भारतीय स्तरावर पाचवा क्रमांक पटकावला. नोयडा, नवी दिल्ली येथे पार पडलेल्या या महोत्सवात विद्यापीठाच्या वाद्यवृंद आणि शिवरथ यामध्ये बळवंतच्या समर्थ जावीर आणि राजू घोलप यांचा समावेश होता.



विटा : येथील बळवंत महाविद्यालयाचे समर्थ जावीर आणि राजू घोलप यांचा विद्यापीठ संघात समावेश होता.

जावीर आणि घोलप यांनी गडचिरोली येथे झालेल्या इंद्रधनुष, गुजरात येथे झालेल्या पश्चिम भारतीय युवा महोत्सव, नोयडा, नवी दिल्ली येथील राष्ट्रीय करंडकावर 'डफडे" आणि 'ढोलकी' या लोकवाद्यावर आपले नाव कोरले. विद्यार्थ्यांना प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे, युवा महोत्सव समिती प्रमुख डॉ. दादासाहेब सनदी, मार्गदर्शक प्रा. के. बी. माने, एस. व्ही. खोत यांचे मार्गदर्शन लाभले. युवा महोत्सव समिती सदस्य, प्राध्यापक यांनी त्यांच्या यशाचे कौतुक केले.


LIBRARIAN
Balwant College
VITA.

**Tarun Bharat Date- 20-02-2020**


तरुण भारत
सांगली
गुरुवार दि. २० फेब्रुवारी २०२०


# 'बळवंत'मध्ये 'वाङ्मयचौर्य आणि प्रकाशन हक्क'वर कार्यशाळा

प्रतिनिधी
विटा

येथील बळवंत महाविद्यालय येथे ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभागाच्यावतीने 'वाङ्मचौर्य आणि प्रकाशन हक्क' विषयावरील राज्यस्तरीय एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यशाळेचे उद्‌घाटन सातारा येथील शिवाजी कॉलेजचे ग्रंथपाल प्रा. एस. टी. लोखंडे यांच्याहस्ते करण्यात आले. कार्यशाळा तीन सत्रात पार पडली.

प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे म्हणाले, युजीसी, विद्यापीठाच्या तसेच नॅकच्या ध्येयधोरणानुसार प्रत्येक महाविद्यालयांनी संशोधनाकडे असणारा कल वाढवावा, गुणवत्ता सुधारण्यासाठी संशोधनाचे काम करणारे विद्यार्थी, प्राध्यापक यांना संशोधनाची माहिती मिळावी आणि संशोधन आणि गुणवत्ता वाढीस वाव मिळावा, या हेतूने कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते, असेही प्राचार्य डॉ. खिलारे यांनी सांगितले.

पहिल्या सत्रात प्रा. लोखंडे यांनी 'संदर्भ ग्रंथसूची तयार करण्याच्या आधुनिक पद्धती' या विषयावर मार्गदर्शन केले. दुसऱ्या माढा येथील कला आणि वाणिज्य महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. वाय. आर. चव्हाण यांनी 'वाङ्मचौर्य शोध प्रक्रियांचा परिचय आणि प्रकाशन हक्क' या विषयावर, तर तिसऱ्या सत्रात कोल्हापूर येथील शाहू कॉलेजचे प्रा. बी. डी. ढाकणे यांनी 'इंटरनेटवरील माहिती मिळविण्यासाठी वापरली जाणारी प्रक्रिया' या विषयावर मार्गदर्शन केले. प्राचार्य खिलारे यांनी संशोधन प्रक्रियेबाबत मार्गदर्शन केले.

प्रास्ताविक ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभाग प्रमुख प्रा. जे. ए. पाटील यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. एस. एम. सय्यद यांनी केले, तर आभार प्रा. एस. एस. चिले यांनी मानले. यावेळी डॉ. यू. एच. शहा, डॉ. पी. एस. साळुंखे, डॉ. ए. जे. बरकडे, डॉ. सी. आर. बोबडे, डॉ. एस. व्ही. पाटील, डॉ. ए. एस. सरतापे, डॉ. के. बी. माने, प्रा. जे. ए. मुलाणी यांच्यासह विविध महाविद्यालयातील ग्रंथपाल, प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी उपस्थित होते.


LIBRARIAN
Balwant College
VITA.

बळवंत कॉलेज
ग्रंथपाल
विभाग

**Tarun Bharat Date-02-03-2020**



तरुण भारत

तरुण भारत - 2 मार्च - 2020

# तरुण पिढी देशाची अनमोल संपत्ती

## प्राचार्य डॉ. राजमाने : बळवंत महाविद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ

प्रतिनिधी

विटा

सध्याचे युग हे स्पर्धेचे आहे. या युगात जगणे, हे एक आव्हान आहे. तरूण पिढी शिक्षण क्षेत्रातील नवनवे बदल आत्मसात करून प्रगती साधत आहे. भारत हा तरूणांचा देश आहे. सक्षम तरूण पिढी देशाची अनमोल संपत्ती आहे, असे प्रतिपादन कराड येथील सद्गुरू गाडगेबाबा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन राजमाने यांनी केले.

येथील बळवंत महाविद्यालय येथे वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात पार पडला. यावेळी प्राचार्य डॉ. राजमाने बोलत होते. अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य एम. एस. बाड होते. रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य आबासाहेब देशमुख, प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे, उपप्राचार्या डॉ. उज्वला शहा यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

विटा : बळवंत महाविद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात बोलताना प्राचार्य डॉ. मोहन राजमाने, यावेळी एस. एस. बाड व अन्य.

प्राचार्य डॉ. राजमाने म्हणाले, शिक्षण क्षेत्रात रयत शिक्षण संस्थेचे अनमोल योगदान आहे. प्रतिकुल परिस्थितीत पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शिक्षणाची गंगा बहुजन समाजापर्यंत पोहचवली. एम. एस. बाड म्हणाले, कष्टाशिवाय यश मिळवता येणार नाही. शिक्षणाने सक्षम व्हा. सक्षम व्यक्तीमत्त्वाचा उपयोग यशस्वी उद्योजक, व्यावसायिक होण्यासाठी करा, असेही बाड म्हणाले.

यावेळी शैक्षणिक, कला, क्रिडा, सांस्कृतिक आणि सामाजिक क्षेत्रात यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्याहस्ते सत्कार करण्यात आला. वरिष्ठ विभागाच्या उपप्राचार्या डॉ. शहा, तर कनिष्ठ विभागातील प्रा. संताजी पाटील यांना आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. आदर्श प्रशासकीय सेवक म्हणून प्रमोद थोरावडे यांचा गौरव करण्यात आला. रतिका बुचडे आणि सचिन जाधव यांना आदर्श विद्यार्थी पुरस्कार प्रदान करण्यात आला. विविध क्षेत्रात यश मिळवलेल्या प्राध्यापकांचाही यावेळी सन्मान करण्यात आला.

प्रास्ताविक, पाहुण्यांचा परिचय प्राचार्य डॉ. खिलारे यांनी करून दिला. शुभसंदेश वाचन प्रा. राहुल पाटील यांनी केले. अहवाच वाचन कार्याध्यक्ष डॉ. पी. एस. साळुंखे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. शहनाज सय्यद यांनी केले, तर आभार कनिष्ठ विभागाचे कार्याध्यक्ष प्रा. एस. एस. कदम यांनी मानले. यावेळी जिमखाना विभाग प्रमुख प्रा. एस. एस. जाध, प्रा. एस. एस. पितांबरे, स्थानिक व्यवस्थापन समिती सदस्य सुरेश पाटील यांच्यासह आजी–माजी विद्यार्थी, पालक उपस्थित होते.

**Janpravas Date-02-03-2020**

दैनिक
बातम्यांचा राजा
# जनप्रवास
Website : janpravas.in
सांगली-कोल्हापूर ■ पान ३
■ सोमवार, दि. २ मार्च २०२०

## मराठीच्या संवर्धनासाठी सार्वत्रिक प्रयत्न महत्वाचे : डॉ. वाघुंबरे

विटा ■ प्रतिनिधी

मराठी भाषेला प्राचीन असा समृध्द वारसा आहे. कोणतीही भाषा तिच्या जन्मापासून प्रौढावस्थेकडे प्रवास करीत असते. परंतु मराठी भाषेमध्ये जन्मतःच प्रौढपणाची लक्षणे दिसून येतात. याचे उत्तम उदाहरण म्हणजे संत ज्ञानेश्वर लिखित ज्ञानेश्वरी होय. कालौघात भाषेमध्ये नित्य नवे परिवर्तन घडत असतात. परकीय भाषांच्या संपर्कामुळे मराठी भाषा प्रभावित झाली आहे. आपल्या माय मराठी मातृभाषेचे संवर्धन करणे प्रत्येक मराठी व्यक्तीचे आद्य कर्तव्य आहे. त्यासाठी सार्वत्रिक प्रयत्न महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन डॉ. दिनेश वाघुंबरे यांनी केले. येथील बळवंत कॉलेजमध्ये मराठी राजभाषा गौरव दिनानिमित्त आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी मराठी विभागप्रमुख डॉ. शिवाजी पाटील होते. डॉ.दिनेश वाघुंबरे म्हणाले, प्राचीन वारसा असणाऱ्या मराठी भाषेतील साहित्य समृद्ध आहे. कविता, कथा, कादंबरी, नाटक अशा अनेक वाड्मय प्रकारातून मानवी जीवनातील अनमोल रत्ने साहित्यिकांनी मराठी भाषेतून उधळली आहे. मराठी भाषिक संस्कृती संपूर्ण जगभरामध्ये आदर्शवत आहे. डॉ. शिवाजी पाटील यांनी कविवर्य कुसुमाग्रज यांच्या साहित्याची ओळख करून दिली. त्याचबरोबर महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्रातील पहिली ते दहावी वर्गाच्या सर्व शाळांमध्ये मराठी भाषा शिकविणे अनिवार्य केल्याच्या निर्णयाचे स्वागत केले. यावेळी विद्यार्थ्यांनी कवितावाचन केले तसेच मराठी भाषेवर आधारित माहितीपट विद्यार्थ्यांना दाखविण्यात आला. प्रास्ताविक प्रा. सुनील बुद्धनावर यांनी केले. सूत्रसंचालन मयुरी तुपे हिने केले. आभार प्रा. वनिता होवाळे यांनी मानले.

## Janpravas Date-30-06-2019

रविवार दि. ३० जून २०१९
website : janpravas.in

सामिश्र

# पुरोगामी महाराष्ट्राच्या उभारणीमध्ये राजर्षी शाहू महाराजांचे योगदान महत्वाचे

## डॉ.आर.व्ही. कुंभार

**विटा ● प्रतिनिधी**

पुरोगामी महाराष्ट्राच्या उभारणीमध्ये ज्या ज्या महापुरूषांनी योगदान दिले, त्यामध्ये छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांचे नाव आवर्जून घ्यावे लागते, असे मत डॉ. आर. व्ही. कुंभार यांनी व्यक्त केले.

येथील बळवंत कॉलेजमध्ये राजर्षी शाहू महाराज यांच्या १४६ व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी. जे. खिलारे होते.

डॉ. आर. व्ही. कुंभार पुढे म्हणाले, राजर्षी शाहू महाराज हे कृतिशील व्यक्तिमत्त्व होते. महाराष्ट्राला पुरोगामी चळवळींची खूप मोठी पार्श्वभूमी आहे. त्यामध्ये महात्मा फुले, गोपाळ गणेश आगरकर, मुकुंदराव पाटील, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील यांचा समावेश होतो. परंतु राजा असून देखील ज्यांनी बहुजनांच्या उभारणीमध्ये स्वतःला झोकून दिले आणि बहुजनांचे सार्वजनिक जीवन उभे केले, असे राजे म्हणजे राजर्षी शाहू महाराज होत.

प्राचार्य सी. जे. खिलारे म्हणाले, आजच्या महाराष्ट्राचे चित्र निर्माण करण्यात राजर्षी शाहू महाराज यांचे निर्णय नेहमीच योग्य ठरलेले दिसून येतात. त्यांनी आपल्या संस्थानामध्ये नेहमीच वेगवेगळे यशस्वी प्रयोग केलेले दिसून येतात. राधानगरी धरण बांधून त्यांनी आपल्या संस्थानातील प्रदेश सुपीक केला, तर सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाने महात्मा फुले यांच्या शैक्षणिक चळवळीला राजकीय पाठिंबाच दर्शविला. एक जाणता राजा म्हणून त्यांचे नाव नेहमीच इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंदविले जाईल.

प्राचार्य
बळवंत कॉलेज, विटा

दै. जनप्रवास - दि. ३०।६।२०१९

**Janpravas Date- 01-07-2019**

दैनिक
www.janpravas.in | janpravaslive.tv
बातम्यांचा राजा
# जनप्रवास
सांगली
पो.र.नं.SGL/25/2019-21 RNI NO. MAHMAR/2003/11365 सोमवार, दि.१ जुलै २०१९ वर्ष-१४ अंक- २०८ पाने-१० मूल्य- ५ रु.

## दलितमित्र व कार्यमग्न व्यक्तिमत्व माधवराव मोहिते

दलितमित्र व कार्यमग्न व्यक्तिमत्व माधवराव मोहिते यांचा आज वाढदिवस त्यानिमित्त....

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांचा वसा घेऊन ज्यांनी आयुष्यभर रयत शिक्षण संस्थेत काम केले ते कै. बाळकृष्ण रावजी मोहिते उर्फ बाळकू आण्णा यांच्याच पावलावर पाऊल टाकून त्यांचे चि. माधवराव मोहिते हे सुद्धा रयत शिक्षण संस्थेत २००६ पासून डॉ. पतंगराव कदम व डॉ. एन. डी. पाटील यांच्या सानिध्यात गेली १०-१२ वर्षे अतिशय निस्वार्थीपणाने काम करत आहेत. सध्या ते रयत शिक्षण संस्थेच्या दक्षिण विभागाचे चेअरमन म्हणून काम करत आहेत. त्यांच्या काळात त्यांनी विभागामध्ये गुणवत्ता आणण्यामध्ये चांगली प्रगती केली आहे. आज त्यांचे वय ८५ वर्षाचे असून सुध्दा ते सतत कामात मग्न असतात. या त्यांच्या कामामुळे महाराष्ट्र सरकारने त्यांना दलित मित्र किताब देऊन त्यांचा सत्कार सुद्धा केला आहे. वाट चुकलेल्या समाजाला फुले, आंबेडकर, शाहू, कर्मवीर यांचा रस्ता दाखवण्याचे काम रयत शिक्षण संस्था करत आहे व ही फार काळाची गरज आहे. त्यांनी असेच पुढे काम करत रहावे. भावी काळासाठी शुभेच्छा.


माधवराव मोहिते

प्राचार्य,
बळवंत कॉलेज, विटा
जि.सांगली

बळवंत कॉलेज * विटा, जि. सांगली *

**Janpravas Date- 02-07-2019**

जनप्रवास - 2 जुलै 2019



# पुरोगामी महाराष्ट्राच्या उभारणीमध्ये राजर्षी शाहू महाराजांचे योगदान महत्वाचे

## डॉ.आर.व्ही. कुंभार

**विटा • प्रतिनिधी**

पुरोगामी महाराष्ट्राच्या उभारणीमध्ये ज्या ज्या महापुरूषांनी योगदान दिले, त्यामध्ये छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांचे नाव आवर्जून घ्यावे लागते, असे मत डॉ. आर. व्ही. कुंभार यांनी व्यक्त केले.

येथील बळवंत कॉलेजमध्ये राजर्षी शाहू महाराज यांच्या १४६ व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी. जे. खिलारे होते.

डॉ. आर. व्ही. कुंभार पुढे म्हणाले, राजर्षी शाहू महाराज हे कृतिशील व्यक्तिमत्त्व होते. महाराष्ट्राला पुरोगामी चळवळींची खूप मोठी पार्श्वभूमी आहे. त्यामध्ये महात्मा फुले, गोपाळ गणेश आगरकर, मुकुंदराव पाटील, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील यांचा समावेश होतो. परंतु राजा असून देखील ज्यांनी बहुजनांच्या उभारणीमध्ये स्वतःला झोकून दिले आणि बहुजनांचे सार्वजनिक जीवन उभे केले, असे राजे म्हणजे राजर्षी शाहू महाराज होत.

प्राचार्य सी. जे. खिलारे म्हणाले, आजच्या महाराष्ट्राचे चित्र निर्माण करण्यात राजर्षी शाहू महाराज यांचे निर्णय नेहमीच योग्य ठरलेले दिसून येतात. त्यांनी आपल्या संस्थानामध्ये नेहमीच वेगवेगळे यशस्वी प्रयोग केलेले दिसून येतात. राधानगरी धरण बांधून त्यांनी आपल्या संस्थानातील प्रदेश सुपीक केला, तर सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाने महात्मा फुले यांच्या शैक्षणिक चळवळीला राजकीय पाठिंबाच दर्शविला. एक जाणता राजा म्हणून त्यांचे नाव नेहमीच इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंदविले जाईल.

# Tarun Bharat Date-02-07-2019

तरुण भारत - 2 जुलै 2019

## पुरोगामी महाराष्ट्राच्या उभारणीत शाहूंचे महत्त्वपूर्ण योगदान

### डॉ. आर. व्ही. कुंभार : बळवंत महाविद्यालयात राजर्षि छत्रपती शाहू महाराज जयंती साजरी

विटा : राजर्षि शाहू महाराजांनी राजा असून देखील, बहुजनांच्या उभारणीत स्वतःला झोकून दिले. पुरोगामी महाराष्ट्राच्या जडणघडणीत अनेक महापुरुषांनी महत्त्वाचे योगदान दिले. त्यामध्ये राजर्षि शाहू महाराजांचे नाव आवर्जून घ्यावे लागेल, असे प्रतिपादन डॉ. आर. व्ही. कुंभार यांनी केले.

येथील रयत शिक्षण संस्थेच्या बळवंत महाविद्यालयात राजर्षि छत्रपती शाहू महाराज जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी डॉ. कुंभार बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे होते. राजर्षि शाहू, कर्मवीर भाऊराव पाटील आणि लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेस यावेळी अभिवादन करण्यात आले.

डॉ. कुंभार म्हणाले, राजर्षि शाहू महाराज हे कृतीशील व्यक्तिमत्त्व होते. महाराष्ट्राला पुरोगामी चळवळीची खूप मोठी पार्श्वभूमी आहे. त्यामध्ये म. फुले, गोपाळ गणेश आगरकर, मुकुंदराव पाटील, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील यांचा समावेश आहे. परंतु राजा असून देखील ज्यांनी बहुजनांच्या उभारणीत स्वतःला झोकून दिले आणि बहुजनांचे सार्वजनिक जीवन उभे केले, असे राजे राजर्षी शाहू महाराज आहेत. छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात पन्नास टक्के आरक्षण, सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यता पाळण्यासाठी बंदी घालणारा कायदा, बलुतेदारी पद्धतीवर कायद्याने आणलेली बंदी, आंतरजातीय विवाहास कायद्याने दिलेली मान्यता, प्राथमिक शिक्षण मोफत आणि सक्तीचे करण्याचा केलेला कायदा याबाबत डॉ. कुंभार यांनी यावेळी माहिती दिली. महात्मा फुले यांच्या निधनानंतर सत्यशोधक चळवळीतील त्यांच्या नेतृत्वाच्या कार्याचा आढावा घेत बहुजन समाजाचा नायक म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना त्यांनी पुढे आणण्याचा प्रयत्न केला, असे डॉ. कुंभार म्हणाले.


प्राचार्य डॉ. खिलारे म्हणाले, आजच्या महाराष्ट्राचे चित्र निर्माण करण्यासाठी राजर्षि शाहू महाराज यांनी तत्कालीन काळात दुरदृष्टीने घेतलेले निर्णय महत्त्वाचे ठरले आहेत. त्यांनी संस्थानात नेहमीच वेगवेगळे यशस्वी प्रयोग केलेले दिसून येतात. राधानगरीसारखे धरण बांधून त्यांनी संस्थानातील प्रदेश सुपीक केला. सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाने महात्मा फुले यांच्या शैक्षणिक चळवळीला राजकीय पाठिंबा दर्शविला. एक जाणता राजा म्हणून त्यांचे नाव नेहमीच इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंदविले जाईल, असेही प्राचार्य डॉ. खिलारे म्हणाले.

प्रास्ताविक सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. सीमा मरजे यांनी केले. सूत्रसंचालन विद्या गायकवाड यांनी केले तर आभार प्रा. डी. ए. पाटील यांनी मानले. यावेळी उपप्राचार्या डॉ. उज्वला शहा यांच्यासह प्राध्यापक, प्रशासकीय सेवक, विद्यार्थी उपस्थित होते.

ग्रंथपाल
बळवंत कॉलेज, विटा

बळवंत कॉलेज ग्रंथपाल विभाग विटा, जि. सांगली

**Tarun Bharat Date- 30-06-2019**



# प्रा. राजोपाध्येंचा सत्कार

प्रतिनिधी
विटा

येथील बळवंत महाविद्यालयाचे ज्युनिअर विभागाचे प्रा. जे. एल. राजोपाध्ये यांचा सेवानिवृत्ती समारंभ नुकताच पार पडला. प्रा. राजोपाध्ये राज्यशास्त्र विभागाचे प्राध्यापक म्हणून रयतेच्या सेवेत रूजू झाले होते. प्राचार्य डॉ. सी. जे. खिलारे यांनी प्रा. राजोपाध्ये यांच्या कामाचे कौतुक केले.

कर्मवीरांच्या विचारांचा एक रयतेचा शिलेदार आज सेवेतून निवृत्त होत आहे. रयत शिक्षण संस्था नेहमीच कर्तव्यदक्ष सेवकांचा सन्मान करत असल्याचे प्राचार्य डॉ. खिलारे यांनी सांगितले.

SSK/VDC

ग्रंथपाल
बळवंत कॉलेज, विटा

**Janpravas Date- 29-07-2019**



दैनिक 'जनप्रवास' दिनांक 29-07-2019

# बळवंत महाविद्यालयात विद्यार्थी पालक शिक्षक मेळावा उत्साहात संपन्न

विटा • प्रतिनिधी

येथील बळवंत महाविद्यालय अकरावी विज्ञान विद्यार्थी-पालक शिक्षक मेळावा प्राचार्य डॉ. सी. जे. खिलारे यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात संपन्न झाला.

प्राचार्य डॉ.सी.जे.खिलारे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी स्पर्धेचे भान ठेवून करिअरचा पर्याय निवडावा. वेळेचे मोल व अभ्यासाची सवय याविषयी जागरुक असणे गरजेचे आहे. प्रत्येक विद्या शाखेचे आपआपले महत्त्व असल्याने महाविद्यालयातील सर्व सोई-सुविधा विद्यार्थींच्या प्रगतीसाठी उपलब्ध आहेत.

प्रा. ए. एल. मोरे, प्रा. एम. एच. बाबर, प्रा.एस.एस.कदम यांनी महाविद्यालयाचे उपक्रम व विज्ञान शाखेचे महत्त्व या विषयी मनोगत व्यक्त केले. पालक प्रतिनिधी पुष्पा बोबडे व प्रताप सोलनकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

स्वागत व प्रास्ताविक एस. एस. भंडारे यांनी केले. यावेळी प्रा. एस. डी. जमदाडे, प्रा. एस. डी. शिंदे यांच्यासह सर्व विद्यार्थी, पालक व प्राध्यापक उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. एम. एन. शिंदे व प्रा. टी. एम. लाड यांनी केले. आभार प्रा. व्ही. आर. थोरबोले यांनी मानले.

MUKTA A2 CINEMAS
Mall, M.G. Road, Station Chowk, Sangli - 416416

# प्रा. जे. एल. राजोपाध्ये यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार

विटा • प्रतिनिधी

येथील बळवंत महाविद्यालयातील ज्युनिअर विभागाचे प्रा. जे. एल. राजोपाध्ये यांचा सेवानिवृत्ती समारंभ प्राचार्य डॉ.सी.जे.खिलारे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.

प्राचार्य डॉ.सी.जे.खिलारे म्हणाले, प्रा. जे. एल. राजोपाध्ये हे एक कर्तव्यदक्ष, विषयाचे जाणकार, विद्यार्थीप्रिय शिक्षक, मितभाषी व प्रतिभासंपत्र असे व्यक्तीमत्व होते. कर्मवीरांच्या विचारांचा एक रयतेचा शिलेदार आज सेवेतून निवृत्त होत आहे. परंतु रयत शिक्षण संस्था नेहमीच कर्तव्यदक्ष सेवकांचा सन्मान करत असते. त्यांनी सेवानिवृत्तीनंतर ही कॉलेजसाठी योगदान द्यावे.

यावेळी डॉ. एस. एम. सय्यद, डॉ. एस. व्ही. पाटील, प्रा. आर. व्ही. पाटील यांच्यासह सर्व विद्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते.

ग्रंथपाल
बळवंत कॉलेज, विटा

बळवंत कॉलेज ग्रंथपाल विभाग विटा, जि. सांगली

**Dainik Date- 02-09-2019**

# कृती करण्यापूर्वी परिणामांचा विचार करा

प्रतिनिधी
विटा

आजचा तरूण व्हॉटस्ॲप, [फे]सबुकसारख्या विविध माध्यमांच्या आहारी जात आहे. परिणामांचा विचार न करता त्याचा वापर करीत आहे. त्यामुळे तो अनेकदा विविध गुन्ह्यांचा बळी ठरतो आहे. कोणतीही कृती करण्यापूर्वी त्याचे काय परिणाम होतील, याचा विचार केला पाहिजे, असे मत न्यायाधीश डी. एस. चोथे यांनी व्यक्त केले.

येथील बळवंत महाविद्यालयात कायदेविषयक जनजागृती शिबिर उत्साहात पार पडले. खानापूर तालुका विधी सेवा समिती, वकिल संघटना आणि महाविद्यालयातील वाणिज्य, व्यवस्थापन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. कनिष्ठ स्तर दिवाणी न्यायाधीश डी. एस. चोथे, सहदिवाणी न्यायाधीश जी. एस. हंगे, डी. एम. हिंगलजकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे अध्यक्षस्थानी होते.

दिवाणी न्यायाधीश चोथे म्हणाल्या, महाविद्यालयीन तरूणांनी कोणत्याही अमिषाला बळी न पडता कायदे समजावून घेवून आपले सार्वजनिक जीवन. व्यथित करावे. त्यामुळे ते देशाचे उत्तम नागरिक म्हणून समोर येतील.

ॲड. प्रज्ञावंत गवळी यांनी आजचा तरूण हा अंमली पदार्थांना बळी पडत आहे. नैराश्य आणि उदासिनतेपोटी हा विधायक मार्ग स्वीकारत आहे. परंतु प्रसंगी त्याला सल्ला आणि कायदेविषयक माहिती देवून यापासून परावृत्त करण्यात यावे, असे सांगितले. ॲड. शौर्या पवार यांनी महिलांविषयक कायद्याची माहिती दिली. सहदिवाणी न्यायाधीश जी. एस. हंगे यांनी भारतीय राज्यघटनेची ओळख करून दिली. न्यायाधीश डी. एस. हिंगलजकर यांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय चारित्र्य कशा पद्धतीने घडवावे, याबाबत मार्गदर्शन केले.

प्रास्ताविक डॉ. श्रेया पाटील यांनी केले तर आभार प्रा. सुशांत भंडारे यांनी मानले. यावेळी डॉ. एन. एस. काळेल, प्रा. वर्षा जाधव, डॉ. सुरेश पवार, शुभांगी पाटील, ॲड. एम. एम. मुजावर, ॲड. सुभाष चव्हाण यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

दै. आजचा लोकशाही सम्राट
दि. २।९।२०१९
ग्रंथपाल
बळवंत कॉलेज, विटा

**Tarun Bharat Date-11-10-2019**

तरुण भारत
सांगली
शुक्रवार दि. ११ ऑक्टोबर २०१९

# कर्मवीरांचा विचार पुढे नेण्याची जबाबदारी तरूणांची

प्रतिनिधी
विटा

कर्मवीरांचा वसा आणि वारसा पुढे घेवून जाण्याची जबाबदारी आजच्या पिढीतील प्रत्येक शिक्षक आणि विद्यार्थ्यांने आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरु प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

येथील बळवंत महाविद्यालयात कर्मवीर भाऊराव पाटील यांची १३२ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के बोलत होते. विटा हायस्कूल, संजय भगवानराव पवार कनिष्ठ महाविद्यालय आणि बळवंत महाविद्यालया यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेच्या दक्षिण विभागाचे अध्यक्ष माधवराव मोहिते होते. प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

डॉ. शिर्के म्हणाले, आज पारंपारिक शिक्षणाबरोबरच कौशल्य प्राप्त करून देणारे शिक्षणही अत्यंत महत्त्वाचे झाले आहे. पारंपारिक शिक्षणातून विद्यार्थ्यांवर जसे मूल्यसंस्कार होतात, कौशल्यप्रधान शिक्षणाने विद्यार्थी स्वयंपूर्ण होण्याचे धडे गिरवत जातो. महाराष्ट्रात सर्व प्रथम कर्मवीर आण्णांनी आपल्या शिक्षण संस्थेत 'कमवा आणि शिका' ही योजना चालू केरून विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबर श्रमाचेही संस्कार दिले. आज श्रमाची परिभाषा बदलली आहे. कौशल्यधिष्ठित शिक्षण पद्धतीला आज जनभर मागणी आहे.

**डॉ. शिर्के : बळवंत आणि विटा हायस्कूलमध्ये कर्मवीर जयंती उत्साहात**

या प्रकारच्या शिक्षणाने विद्यार्थी स्वयंरोजगाराच्या वाटा निर्माण करू शकतो. महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठांत ही योजना कार्यरत आहे. गोरगरीब वर्गातील होतकरू विद्यार्थी या योजनेचा लाभ घेवून आपले शिक्षण पूर्ण करीत आहेत. आपले उत्तरदायित्व म्हणून आजचा महाराष्ट्र घडविण्यासाठी कर्मवीरांचा वसा आणि वारसा प्रत्येकाने पुढे नेला पाहिजे, असेही डॉ. शिर्के म्हणाले.

माधवराव मोहिते म्हणाले, आज रयत शिक्षण संस्था शतकपूर्तीकडे वाटचाल करीत आहे. पुरोगामी महाराष्ट्राच्या जडणघडणीत शिक्षण संस्थेचे योगदान लक्षणीय आहे. सातशेपेक्षा अधिक शाखा असणाऱ्या या संस्थेने स्वातंत्र्य, समता, बंधुता, स्वावलंबन या गोष्टींवर नेहमीच भर दिलेला आहे. त्यामुळे या संस्थेला भविष्यातही कीर्ती लाभो, अशी अपेक्षा मोहिते यांनी यावेळी व्यक्त केली.

प्रास्ताविक प्राचार्य डॉ. खिलारे यांनी केले तर प्राचार्य बी. ई. माळी यांनी आभार मानले. यावेळी विविध स्पर्धांचा पारितोषिक वितरण समारंभ पार पडला. यावेळी ॲड. सुभाष पाटील, प्रा. मेजर पांडुरंग शितोळे, प्राचार्य बी. जी. कोरे, डॉ. प्रकाश गोकाशी यांच्यासह महाविद्यालयीन विकास समिती आणि स्कूल कमिटी सदस्य, संस्थेचे हितचिंतक, प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.

ग्रंथपाल
बळवंत कॉलेज, विटा

**Janpravas Date- 06-12-2019**

News २ शुक्रवार,ता.६ डिसेंबर २०१९

# विटा बसस्थानकात स्वच्छता अभियान

## नगरपरिषदेसह नागरिक, शालेय विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग

विटा,ता.५(प्रतिनिधी)

स्वच्छ सर्वेक्षण २०१९ मध्ये देशपातळीवर चौथा क्रमांक पटकावून देशामध्ये नावलौकिक मिळवलेल्या विटा नगरपरिषदेला आता स्वच्छ सर्वेक्षण २०२० मध्ये देशामध्ये प्रथम क्रमांक मिळविण्याची आस लागली आहे.याच पार्श्वभूमीवर नगपरिषदेने स्वच्छ सर्वेक्षण २०२० ची जय्यत तयारी सुरू केली आहे.

या स्वच्छ सर्वेक्षण २०२० च्या अंतर्गत शहरामध्ये स्वच्छता श्रमदान,रस्ते साफसफाई,गटर. सफाईची जोरदारपणे मोहीम राबविण्यात येत आहे.या मोहिमे अंतर्गत सकाळी ६ वाजता बस स्थानक परिसरामध्ये स्वच्छता करण्यात आली.अग्निशामक दलाने संपूर्ण परिसर पाण्याने साफ केला.



विटा: बसस्थानकात स्वच्छता मोहिमेचा शुभारंभ करताना मुख्याधिकारी अतुल पाटील, आगार व्यवस्थापक ए.एस. थोरात,उदय पवार, प्राचार्य चंद्रकांत खिलारे व अन्य.

विटा शहराच्या मध्यवर्ती असलेले विटा बसस्थानक प्रशस्त आहे. विटा बसस्थानकामध्ये विविध भागातून येणाऱ्या प्रवाशांची संख्याही मोठी आहे. बस स्थानक सातत्याने स्वच्छ ठेवण्याचा पालिकेचा प्रयत्न असतो. बसस्थानक स्वच्छता मोहिमेत बळवंत महाविद्यालयाचे विद्यार्थी, शिक्षक, नागरिक, आणि पालिकेचे कर्मचारी उपस्थित होते. मुख्याधिकारी अतुल पाटील यांनी स्वच्छता व श्रमदानामध्ये सहभागी झालेल्या लोकांचें आभार मानले. या स्वच्छता मोहीमेवेळी आगार व्यवस्थापक ए.एस. थोरात, साहय्यक व्यवस्थापक यू. टी. पवार, बळवंत महाविद्यालयाचे प्राचार्य चंद्रकांत खिलारे, प्राचार्य बारवडे, एनसीसी विभागाचे प्रमु[illegible] सर्जेराव चिले, आरोग्य निरीक्ष[illegible] आनंदा सावंत नगरपरिषद कर्मचारी व पदाधिकारी यांनी सहभाग घेतला.

LIBRARIAN
Balwant College.
VITA.

## Janpravas Date-06-12-2019

७ दैनिक जनप्रवास सांगली

■ शुक्रवार, दि. ६

Website : janpra

दि- ६/१२/२०१९

# विटा बसस्थानकात स्वच्छता श्रमदान

## नागरिक व विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग

विटा ● प्रतिनिधी

स्वच्छ सर्वेक्षण २०१९ मध्ये देशपातळीवर चौथा क्रमांक पटकावून आपला देशामध्ये नावलौकिक मिळवलेल्या विटा नगरपरिषदेला आता स्वच्छ सर्वेक्षण २०२० मध्ये देशामध्ये १ क्रमांकाची आस लागली आहे. याच पार्श्वभूमीवर नगरपरिषदेने स्वच्छ सर्वेक्षण २०२० ची जय्यत तयारी सुरू केली आहे.

या स्वच्छ सर्वेक्षण २०२० च्या अंतर्गत शहरामध्ये स्वच्छता श्रमदान, रस्ते साफसफाई, गटर सफाई ची जोरदारपणे मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत आज सकाळी ६ वाजता बसस्थानक परिसरामध्ये स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

या स्वच्छ सर्वेक्षण २०२० स्पर्धेत नगरपरिषद पूर्ण ताकदीने उतरली असून शहरातील नागरिकांनी सुध्दा या स्पर्धेसाठी नगरपालिकेला सहकार्य करावे. आपल्या घरातील ओला व सुका कचरा असा विलगीकरण करून घंटागाडी मध्ये देऊन नगरपरिषदेला सहकार्य करावे. त्याचबरोबर शहरातील नागरिकांनी आपल्या ओल्या कचऱ्यापासून कंपोस्ट खत तयार करावे व ते खत कसे तयार करायचे या साठी नागरिकांनी नागरपरिषदेमध्ये संपर्क साधावा. तसेच शहरातील विविध मंडळे, बचतगट यांनी सक्रिय सहभाग घेऊन आपआपल्या परिसरामध्ये स्वच्छता करावी. शहरातील नागरिकांनी शहरामधील रस्त्याच्या बाजूला असणाऱ्या ट्विनबीन मध्ये घरगुती कचरा टाकू नये हे ट्विनबीन शहरामध्ये बाहेरून येणाऱ्या नागरिकांसाठी आहेत. जेणेकरून त्यांनी घेतलेल्या खाद्यपदार्थाचा कागद इतरत्र न टाकता त्या ट्विनबीन मध्ये टाकावा.


स्वच्छतेचे ब्रँडअॅबॅसिटर माजी नगराध्यक्ष अॅड. वैभव पाटील, नगराध्यक्षा प्रतिभा पाटील, उपनगराध्यक्ष संजय तारळेकर, आरोग्य सभापती अॅड. विजय जाधव, मुख्याधिकारी अतुल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छ सर्वेक्षण २०२० ची जोरदार तयारी सुरू केली आहे. विटा शहराच्या मध्यवर्ती असलेले विटा बस स्थानक प्रशस्त भव्य आहे. विटा बसस्थानकामध्ये विविध भागातून येणाऱ्या प्रवाशांची संख्याही मोठी आहे. विटा बसस्थानक विटा नगरपरिषद सातत्य हा परिसर स्वच्छ व सुंदर ठेवण्याचा प्रयत्न करत आहे. विटा बसस्थानक प्रशासन व बसस्थानकातील सर्व व्यवसायिक व रहिवासी नागरिकांनी आपला परिसर स्वच्छ व सुंदर ठेवूया, असे आवाहन मुख्याधिकारी अतुल पाटील यांनी केले. या स्वच्छता मोहीमेवेळी डेपो मॅनेजर ए. स. थोरात, सहाय्यक डेपो मॅनेजर यू. टी. पवार, बळवंत महाविद्यालयाचे प्राचार्य चंद्रकांत खिलारे, प्राचार्य बारवडे, एनसीसी विभागाचे प्रमुख प्राचार्य चिले, नगरपरिषद अधिकारी, कर्मचारी व पदाधिकारी व नागरिकांनी सहभाग घेतला.



विटा : येथील विटा बसस्थानकात स्वच्छता मोहिमप्रसंगी मुख्याधिकारी अतुल पाटील यांच्यासह पालिका अधिकारी, कर्मचारी, नागरिक व विद्यार्थी.

प्राचार्य
बळवंत कॉलेज, विटा

# The Times of India Date 18-12-2019



The Times of India
दि० 18-12-2019

Rayat Shikshan Sanstha's

**Balwant College, Vita**

Tal - Khanapur, Dist - Sangli
(MAHARSHTRA STATE)

**e-Tender Notice**

**Main Portal : http://mahatenders.gov.in**

Principal, Balwant College, Vita, Dist - Sangli through the process of e-tendering invites e-tender for PWD_Work No. 01 to 11/2019 (11 Works) in B1 manner, for the rate of percentage from the registered tenderers. The details of e-tender for tenderers is made available on **http://mahatenders.gov.in**. The tender duration for work sr. no. 01 to 04 opens from 17th December, 2019 at 11.00 a.m. to 4th January, 2020 till 5.30 p.m. The received tenders will be opened on 6th January 2020 after 11.00 a. m. The tender duration for the work sr. no. 05 to 11 opens from 17th December, 2019 to 24th December, 2019 and the received tenders will be opened on 26th December, 2019 after 11.00 a. m. Tenders not received within time & with terms & conditions will not be considered. All rights for acceptance or rejection of tenders and change in rules & regulation in tenders have been reserved by the Principal, Balwant College, Vita.


**Principal,**
**Balwant College, Vita**
**Tal - Khanapur, Dist - Sangli**
**(MAHARSHTRA STATE)**

THE TIMES OF INDIA

BENNETT, COLEMAN & CO. LTD. | ESTABLISHED 1838 | TIMESOFINDIA.COM | KOLHAPUR | WEDNESDAY, DECEMBER 18, 2019 | PAGES 18 | PRICE ₹4

प्राचार्य
बळवंत कॉलेज, विटा

**Pudhari Date- 27-12-2019**



रयत शिक्षण संस्थेचे

## बळवंत कॉलेज, विटा

ता. खानापूर, जि. सांगली

### संक्षिप्त जाहीर फेर ई-निविदा सूचना क्र.२/२०१९

PWD_Work No. 05 to 10/2019 (मुदतवाढ १)

प्राचार्य, बळवंत कॉलेज, विटा जिल्हा सांगली हे PWD_Work No. 05 to 10/2019 (9 कामे) या कामांसाठी नोंदणीकृत मक्तेदारांकडून परसेंटेज दराची ई-निविदा बी-१ पध्दतीने दि. २४/१२/२०१९ अखेर दाखल करावयाच्या निविदेत अल्पसा प्रतिसाद मिळाल्याने सदर कामाच्या फेरनिविदा http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर मागविणेत येत असून त्याचा कालावधी दि.२७.१२.२०१९ सकाळी ११.०० वाजलेपासून दि. ०२/०१/२०२० सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत राहील. निविदेच्या अटी शर्तीमध्ये बदल करणे, प्राप्त निविदापैकी १ किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारणेचा हक्क निम्न स्वाक्षरीत यांनी राखून ठेवला आहे. दाखल निविदा दि. ०४/०१/२०२० रोजी सकाळी ११.३० नंतर उपलब्ध वेळेनंतर उघडण्यात येतील.

प्राचार्य

बळवंत कॉलेज, विटा